# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५**
**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्री. कृष्णराव धोंडिबा भेगडे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

**तीन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)** : महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या वर्षांचे वार्षिक लेखे व महालेखापाल (लेखापरीक्षा-१) महाराष्ट्र यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : औचित्याचे मुद्दे**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्रीमती स्नेहा दुबे, श्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अमित साटम, मोहन मते, विलास तरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा असूनही वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यांमुळे शहरात ऐन पावसाळ्यात सातत्याने भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागणे, सुर्या प्रकल्पाला वीज पुरवठा करणाऱ्या साडेचार कि.मी.लांबीच्या वीजवाहक तारा वारंवार तुटण्याचे प्रकार घडत असल्याची बाब समोर येणे, महावितरणकडून वीजवाहक तारा संरक्षित करण्यासाठी रूपये १.३८ कोटी खर्च करण्यात येणे, तारा संरक्षित केल्यानंतरही इतर समस्या उद्भवण्याचे प्रकार घडणे, दुसरीकडे एम.एम.आर.डी.ए. तर्फे सुर्याच्या नव्या पाणी योजनेमध्ये अशाच प्रकारच्या अन्य समस्या निर्माण होण्याचे प्रकार घडणे, त्यामुळे जून महिन्याच्या १८ दिवसांत सुर्याच्या दोनही योजनांचा वीजपुरवठा तब्बल ४४ वेळा खंडीत होण्याचे प्रकार घडणे, परिणामी संपूर्ण शहराच्या पाणी पुरवठ्यावर मोठा परिणाम होणे, गृहनिर्माण संस्था, चाळी व झोपडपट्टीतील रहिवाश्यांवर

पाण्याकरीता अधिक पैसे मोजून खाजगी टँकर्स मागविण्याची वेळ येणे, अशा घटना घडण्यास जबाबदार असलेल्या महावितरण अधिकाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊन सतत निर्माण होत असलेल्या पाणी टंचाईमुळे नागरिकांमध्ये शासनाविरूध्द पसरलेली नाराजी दूर करून दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२) श्री. तुकाराम काते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"चेंबूर घाटला महानगरपालिका वसाहत संक्रमण छावणी १०० / ३७८ गाळे बैठ्या पत्राचाळी सन १९७५-७६ साली स्थलांतरित प्रकल्पबाधितांसाठी मुंबई महानगरपालिकेने बांधल्या असणे, त्यात प्रकल्पग्रस्त राहण्यास उत्सुक नसल्याने सदर निवासस्थाने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना मालकी हक्क तत्वावर देणार आहोत असे सांगून सदर कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या असणे, मौखिक आदेश प्रत्यक्षात सन १९८९ मध्ये निवासस्थान मालकी हक्क तत्वावर देण्यासंदर्भात सुधार समितीत ठराव मंजूर होणे, सन १९९१ साली महानगरपालिका आयुक्त यांनी मालकी हक्क तत्वावर देण्यासंदर्भात आणि पुनर्विकास करण्यासंबंधी मंजुरी देण्यात आली असणे, सदर धोरणात्मक निर्णयानुसार मागील सुमारे ४५ वर्षापासून कर्मचारी वास्तव्यास असणे, त्या कारणाने कर्मचाऱ्यांनी निवासस्थान न खाली करणे यास्तव महानगरपालिकेने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, उपदान, अंश राशीकरण, रजा रोखीकरण व मासिक निवृत्ती वेतनादी दावे रोखून ठेवले असणे, वडिलांचा महानगरपालिका निवासस्थानाचा पत्ता सेवा अभिलेखात व SAP प्रणालीमध्ये नोंद असल्यामुळे त्यांच्या मनपाच्या सेवेत असे नातेवाईक वारस यांचे निवृत्तीवेतन आदी दावेसुद्धा रोखून ठेवण्यात आलेले असणे, या कारणाने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे, आर्थिक परिस्थिती बिकट असणे, मुलांचे शिक्षण व लग्न होत नसल्याने याचा गांभीर्याने विचार करणे अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) श्री.सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील मालाड पूर्व, नागरी निवारा वसाहतीतील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासनाने १५ ते २५ वर्षापूर्वी कब्जे हक्काने प्रदान केलेल्या मिळकतीचे भोगवटादार वर्ग-२ मधुन भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्यासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रिकेनुसार सध्या देय असलेली मुल्यांकनाची १० टक्के रक्कम न आकारता एक टक्क्यापेक्षा अधिक रक्कम आकारणी न करण्याची नागरी निवारा वसाहत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संघानी दिनांक २७ जून, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना लेखी निवेदन देऊन मागणी करणे मात्र अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न होणे, सदरहू प्रकल्प हा अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी असणे, प्रकल्पाचे काम सुरु होण्याआधीच ६२ एकर जमीनीची किंमत संस्थानी शासनास अदा केलेली असणे, वसाहतीतील १०० हुन अधिक संस्थानी

अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करुनही त्याचा संस्थाना कोणताही लाभ न होणे, शासनाने प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रिकेनुसार २०० ते ३५० चौ.फुट क्षेत्राच्या घरासाठी आकारण्यात येत असलेली मुल्यांकनाची १० टक्के रक्कम भरण्यास गृहनिर्माण संस्था या आर्थिकदृष्टया असमर्थ असुन सदर रक्कम भरणे अवाक्याबाहेर असणे, शासनाने दिनांक ७ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार एक टक्क्यापेक्षा कमी देय रक्कम आकारण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) सर्वश्री.विनोद अग्रवाल, संजय पुराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया तालुक्यातील काटी, कासा, ब्राम्हणटोला, उधईटोला, पुजारीटोला या गावांलगत बाघ नदीमध्ये पावसाळ्यामध्ये मध्यप्रदेश राज्यातील संजय सरोवरमधील अतिरिक्त पाणी वैनगंगा नदीमध्ये सोडण्यात येत असणे, वैनगंगा नदीची उपनदी बाघ नदीतील पुराच्या पाण्यामुळे उक्त गावे वेढली जाणे, उक्त गावांना जोडणारा मार्ग पुराच्या पाण्याखाली येणे, काटी-कासा-ब्राम्हणटोला-उधईटोला-पुजारीटोला या गावांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटलेला असणे, पूर प्रवण क्षेत्रामध्ये मोठ-मोठी झाडे असल्याने रेस्क्यू ऑपरेशन करण्यास अडचणी येत असणे, पूर बाधीत गावातील गंभीर रुग्णांना तथा विशेषत: गरोदर मातांना आरोग्य सेवा पुरविण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होऊन आरोग्य सेवेला विलंब होत असल्याने आजारी रुग्णांचा उपचाराविना नाहक बळी जाणे, बाधीत गावांना जोडणाऱ्या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अनुषंगिक बांधकामाकरीता नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाने रुपये ६५.०० कोटींचा प्रस्ताव शासनाला सादर करणे, प्रस्तावाला तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी मंजुरी प्रदान करणे, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभागाचे तांत्रिक समितीने प्रस्तावाला तांत्रिक त्रुटीमुळे नामंजूर करणे, पूर बाधीत गावांचे पुनर्वसन करण्यास रुपये ५००.०० कोटींचा खर्च येणे, प्रस्तावातील रुपये ६५.०० कोटी अनुषंगिक बांधकामामुळे शासनाचे रुपये ५००.०० कोटी वाचत असणे, पावसाळ्यामध्ये बाघ नदीला येणाऱ्या पुराचे पाण्यामुळे नागरिकांच्या होत असलेल्या जीवित व आर्थिक हानीमुळे पसरलेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"३२ शिराळा, जि.सांगली या गावातील जगप्रसिध्द नागपंचमीच्या सणाला जिवंत नागाची पुजा करण्यावर मागील काही वर्षापासून शासनाद्वारे बंदी घालण्यात आल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, उक्त ठिकाणी शेकडो वर्षापासून गुरु गोरक्षनाथांनी सुरु केलेल्या परंपरेनुसार नागपंचमी सण हा उत्साहात साजरा करण्यात येत असून याकरिता स्थानिक नागरीकांकडून परिसरातील जिवंत नाग पकडून त्यांची विधीवत पुजा करुन त्यांच्या जिवीतास कोणताही धोका न करता पुन्हा त्यांना पकडलेल्याच मूळ ठिकाणी सुखरुपपणे सोडण्यात येत असणे, त्यानुसार ३२ शिराळा येथील गुरु

गोरक्षनाथांचे अनुयायी, अनेक साधु, भक्तगण तसेच शिराळा व पंचक्रोशीतील हजारो ग्रामस्थ यांनी जीवंत नागाची पुजा पुर्ववत चालु व्हावी यासाठी शासनाकडे अंदोलने, निवेदने देऊन तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, तद्नुसार उक्त ठिकाणच्या जगप्रसिध्द नागपंचमी सणावेळी जीवंत नागाची पुजा पुर्वापार हिंदू धर्मातील चालीरीतीप्रमाणे पूर्ववत सुरु होण्यासाठी जलीकट्टू व बैलगाडा शर्यती यास अन्य कायद्याची बाधा न येता ज्याप्रमाणे शासनाने परवानगी दिली त्याच धर्तीवर ३२ शिराळकरांचा पारंपारिक नाग पंचमीचा सण त्यानिमित्त नागाचा शोध घेणे, नाग पकडणे, पुजा करुन कोणतीही इजा न होता तो परत मुळ ठिकाणी सोडणे यास शासन मान्यता देण्यासाठी शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. अबू आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मानखुर्द - शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये जेवढ्या मनपा शाळा आहेत त्याची क्षमता पूर्ण झाल्याने शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत नसणे, सदर कारणामुळे पालकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, गोवंडी विभागात जागो - जागी खासगी शाळा असणे, परंतु शाळांना मंजुरी नसणे, आर.टी.ई. अनुसार शाळांसाठी आवश्यक असणारी इमारत, मैदान, जागा व इतर अटी पूर्ण करीत नसल्याने खासगी शाळांना परवानगी न मिळणे, अशा शाळांना अवैध घोषित करून काळ्या यादीत टाकण्यात येणे, विभागातील मुलांच्या शिक्षणाकरिता दुसरा कोणताही पर्याय नसणे, तसेच खासगी शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, खासगी शाळांना मानखुर्द शिवाजीनगर सारख्या झोपडपट्टी असलेल्या विभागात खेळाचे मैदान, इमारत व अन्य अटी पूर्ण न करता येणे, सदर खासगी शाळा ह्या विद्यार्थ्यांकडून कमी फी मध्ये शिक्षण देत असणे, तसेच झोपडपट्टी पुनर्वसनाकरीता एस.आर.ए. प्रकल्प आहे त्याच धर्तीवर विभागात असलेल्या शाळांना पुनर्वसनामध्ये समाविष्ट करण्याबाबत व काही सौम्य अटींवर खासगी शाळांना मंजुरी देण्याची मागणी करण्यात येणे किंवा मनपा शाळांची संख्या वाढविण्याची मागणी करण्यात येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री. सिध्दार्थ खरात, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील जवळपास सर्वच मंडळांमध्ये दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी अचानक ढगफुटीसदृश्य पाऊस पडणे, ढगफुटीमुळे २१२ मि.मि इतका विक्रमी पाऊस होणे, त्यामुळे नदी नाले व छोट्यामोठ्या सर्वच नद्यांची पाणी पातळी ओलांडून नदीपात्रातून पाणी प्रवाह बदलून लगतची हजारो हेक्टर शेत जमीन खरडून जाणे, महापुरामुळे शेताचे व शेती पिकांचे नुकसान होणे, शेतक-यांची जनावरे, स्प्रिंकलर सेट व केबल, सोलार पंप, महावितरणचे पोल वाहून जाणे, शेत रस्ते, पाणंद रस्ते व त्यावरील पुलाचे प्रचंड

नुकसान होणे, गावात, घरात व झोपडपट्टयांमध्ये पाणी साचून ओढावलेली भयावह परिस्थिती, खचलेला शेतकरी व सामान्य माणसाला दिलासा देण्याची आवश्यकता, शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची पहाणी करुन भरपाई देण्याची कार्यवाही सध्या सुरु असणे, या भागात कमी कालावधीत जास्त पाऊस झाल्यामुळे नुकसान भरपाईचे निकष बदलून शेतक-यांना वाढीव मदत देण्याची आवश्यकता, या भागातील झालेल्या नुकसानीसाठी ५००-७०० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज शासनाने जाहिर करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे करणे, शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून विशेष स्वरुपाची मदत देण्याची आवश्यकता, शासनाने यासंदर्भात केलेली व करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके :-**

**(अ) वने मंत्र्यांचा प्रस्ताव (म.वि.स. नियम १५४ अन्वये ) :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४- गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

एचबी-१८३ (२५००-०७-२०२५)-२

(२) (क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

आठ : **(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, सिध्दार्थ शिरोळे, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री दिपक केसरकर, विजय शिवतारे, संजय केळकर, संजय बनसोडे, रमेश बोरनारे, संभाजी निलंगेकर-पाटील, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश सुर्वे, शेखर निकम, ॲड.पराग अळवणी, राजेंद्र गावित, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री अतुल भातखळकर, प्रकाश सोळंके, प्रदीप जैस्वाल, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, अनिल पाटील, किसन कथोरे, शांताराम मोरे, राजकुमार बडोले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री दिलीप लांडे, महेंद्र थोरवे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, महेंद्र दळवी, डॉ.राहुल आहेर, श्री.तुकाराम काते, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री भिमराव तापकीर, निलेश राणे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीत साटम, सुहास कांदे, सचिन पाटील, रणधीर सावरकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मुरजी पटेल, राम कदम, विश्वनाथ भोईर, दिलीप बनकर, विलास तरे, शरद सोनवणे, कॅ. आर. तमील सेल्वन, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री राजेश मोरे, मिहिर कोटेचा, प्रवीण दटके, हिरामण खोसकर,**

**पराग शाह, चंद्रकांत नवघरे, शंकर जगताप, कालिदास कोळंबकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय उपाध्याय, कुमार आयलानी, मंगेश चव्हाण, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री नरेंद्र मेहता, महेश लांडगे, रविंद्र चव्हाण, अभिमन्यू पवार, डॉ. अतुल भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संतोष दानवे, हेमंत रासने, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, ॲड. राहुल कुल, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, सुनिल कांबळे, सुरेश भोळे, विक्रम पाचपुते, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश वानखडे, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री विलास भुमरे, राजेश बकाने, समीर कुणावार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, सुमित वानखेडे, हरिष पिंपळे, राघवेंद्र पाटील, शिवाजी कर्डिले, सर्वश्रीमती श्वेता महाले, मोनिका राजळे, सर्वश्री चैनसुख संचेती, समीर मेघे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री बबनराव लोणीकर, किर्तीकुमार भांगडिया, प्रशांत बंब, नारायण कुचे, राणाजगजितसिंह पाटील, प्रकाश भारसाकळे, राजू तोडसाम, सुरेश धस, राजेश पवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जितेश अंतापुरकर, डॉ. तुषार राठोड, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, सुभाष देशमुख, विजय देशमुख, मनोज घोरपडे, राहुल आवाडे, अमल महाडिक, धनंजय गाडगीळ, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकाशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून

असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठ्या शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळ्याचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिलह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला

भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत" या विषयावरील श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५० ला दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील."

**(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"कोसंबी रिठ (ता.पोभुर्णा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांना एमआयडीसीकरिता संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला देणेबाबत" या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९१३ ला दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

**(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आलेल्या सी. आर. आय. कंपनीच्या कृषी सोलर पंपाच्या तक्रारीबाबत” या विषयावरील श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८१० ला दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा